ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 34 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 34 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 52-M (OS)**

**Code No. : 52-M (OS)**

**ಶಿಕ್ಷಣ – III**

**EDUCATION – III**

# ವಿಷಯಾಧಾರಿತ ಬೋಧನಾ ಪದ್ಧತಿ – II

# ಗಣಿತ

# CONTENT BASED METHODOLOGY OF TEACHING – II

# MATHEMATICS

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)

( Marathi Version )

**(ಹಳೆ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**( Old Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 08. 06. 2017 ]

Date : 08. 06. 2017 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ] [ ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 100

Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ] [ Max. Marks : 100

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

**भाग - A**

I. खालीलपैकी कोणत्याही **चार** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **तीन** पानापेक्षा जास्त असू नये. त्याच प्रश्नाच्या भाग (a) आणि (b) ची उत्तरे लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाला **दहा** गुण आहेत : $4 \times 10 = 40$

1. a) प्राथमिक शाळतील गणिताच्या अध्यापनाच्या सहा तत्वांचे थोडक्यात वर्णन करा.

   b) प्राथमिक शाळेतील गणिताच्या अध्यापनाची कोणतीही चार सामान्य उद्दिष्ट्ये लिहा. 6 + 4

2. a) प्राथमिक शाळेमध्ये गणिताच्या अध्यापनाने तुम्ही शिस्तीचे मूल्य आणि सौंदर्यात्मक मूल्य कसे विकसित कराल ? वर्णन करा.

   b) गणिताच्या अध्ययनातील चार प्रकारची कौशल्ये लिहा. कोणत्याही एका कौशल्याचे उदाहरणासह वर्णन करा. 6 + 4

3. a) ''उत्तम पाठ योजना गणित शिक्षकाच्या अध्यापनाचे सामर्थ्य वाढविते.'' याचे समर्थन करणारी सहा कारणे द्या.

   b) प्राथमिक शाळेच्या वार्षिक योजनेच्या कार्यवाहीचे कोणतेही चार फायदे लिहा. 6 + 4

4. a) 'जर अनुमानजन्य हा शोध आहे तर आनुमानिक हे उपयोजन आहे.' या विधानाचे उदाहरणासह स्पष्टीकरण करा.

   b) प्राथमिक शाळेमध्ये गणिताशी संबंधित मुलाना देण्यासाठी कोणत्याही चार योजना सूचवा. 6 + 4

5. a) अभ्यासक्रम म्हणजे काय ? प्राथमिक शाळेतील गणिताचा अभ्यासक्रम निवडीच्या पाच तत्वांचे थोडक्यात वर्णन करा.

   b) गणिताच्या अभ्यासक्रमाच्या तार्किक आणि मानसशास्त्रीय संघटनेमधील कोणतेही चार फरक लिहा. 6 + 4

6. a) गणिताच्या अध्यापनामध्ये परिणामकारी दृक-श्राव्य साहित्य बनविण्यासाठी तुम्ही विचारात घेतलेली कोणतीही 12 महत्वाची गुण लक्षणे लिहा.

   b) गणिताच्या अध्यापनामध्ये काळया फलकाचे कोणतेही चार फायदे लिहा. 6 + 4

7. a) प्राथमिक शाळेतील गणिताची उत्तम प्रश्नपत्रिका तयार करताना वापरलेल्या पायऱ्यांचे थोडक्यात वर्णन करा.

   b) प्राथमिक शाळेतील गणिताच्या दीर्घोत्तरी प्रकारच्या परीक्षेचे कोणतेही चार फायदे लिहा.

6 + 4

## भाग - B

II. खालीलपैकी कोणत्याही **सात** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एका** पानापेक्षा जास्त असू नये. प्रत्येक प्रश्नाला **पाच** गुण आहेत : $7 \times 5 = 35$

8. गणिताच्या अध्ययनामध्ये मुलाना उत्तेजित करण्यासाठी तुम्ही विचारात घेतलेली कोणतीही पाच तंत्रे लिहा.

9. 'बैजिक राशी' च्या अध्यापनाशी संबंधित 'ज्ञानाशी' कोणतीही दोन आणि 'आकलनाशी' तीन वर्तणूकीय उद्दिष्ट्ये लिहा.

10. प्राथमिक शाळेतील गणिताच्या अध्यापनाच्या संपन्मूल घटकाचे आयोजन करताना विचारात घेतलेली वैशिष्ट्ये लिहा.

11. संशोधन पद्धत म्हणजे काय ? संशोधन पद्धतीच्या पायऱ्यांचा उपयोग करून तुम्ही विद्यार्थ्यांमध्ये 'आयताचे गुणधर्म' या परिकल्पनेचा विकास कसा कराल ?

12. कार्यक्रमाभिमुख अध्यापन म्हणजे काय ? कार्यक्रमाभिमुख अध्यापनाचे कोणतेही चार फायदे लिहा.

13. प्राथमिक शाळेतील गणिताच्या अध्ययनामध्ये मुलांच्या अध्ययन उणीवांची कोणतीही पाच कारणे द्या.

14. गणिताच्या अध्ययनातील कार्य पुस्तिकेचे कोणतेही पाच उपयोग लिहा.

15. प्राथमिक शाळेतील गणिताच्या अध्ययनासाठी क्षेत्र सहलीचे तुम्ही कसे आयोजन कराल ? क्षेत्र सहलीसाठी योग्य असलेल्या कोणत्याही दोन परिकल्पना सुद्धा सूचवा.

16. गणिताच्या अध्यापनातील सुधारीत उपकरणाच्या कोणत्याहो पाच तत्वाचे थोडक्यात वर्णन करा.

17. गणितातील मौल्यमापनाच्या प्रमाणित चाचणीच्या कोणत्याही पाच लक्षणांची यादी करा.

## भाग - C

III. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये. प्रत्येक प्रश्नाला **तीन** गुण आहेत : $5 \times 3 = 15$

18. गणिताचा जीवशास्त्राशी असणारा संबंध दर्शविणारी कोणतीही तीन उदाहरणे द्या.

19. प्राथमिक शाळेतील गणितातील कोणताही एक पाठ तुम्ही निवडा आणि गणिताच्या अध्ययनात मिळविलेल्या कोणत्याही तीन सामर्थ्यांची यादी करा.

20. प्राथमिक शाळेतील गणितातील प्रतिभावंत मुलांसाठी तुम्ही योजना केलेले कोणतेही तीन योग्य शैक्षणिक कार्यक्रम सूचवा.

21. प्राथमिक शाळेतील गणित संघासाठो कोणत्याही सहा कृती सूचवा.

22. गणिताचा दैनंदिन जीवनामध्ये सहसंबंध दर्शविणारी कोणतीही तीन उदाहरणे द्या.

23. "रेडिओ हे विस्तृत प्रमाणातील अध्यापन साधन आहे." वर्णन करा.

24. प्राथमिक शाळेतील गणिताच्या अध्यापनातील परिहार बोधनाचे कोणतेही तीन उपयोग लिहा.

**भाग - D**

IV. खालील **सर्व** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एक** किंवा **दोन** वाक्यापेक्षा जास्त असू नये. प्रत्येक प्रश्नाला **एक** गुण आहे : $10 \times 1 = 10$

25. 3/4 हा अपूर्णांक आकृतीने दर्शवा.

26. गणितामध्ये शिक्षकाने किमान अध्ययन पातळीच्या आकलनाचे कोणतेही दोन उपयोग लिहा.

27. प्राथमिक शाळेतील गणिताच्या अध्ययनामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रशंसेचे कोणतेही दोन घटक ओळखा.

28. 'सम अपूर्णांक' या परिकल्पनेच्या विकासासाठी विद्यार्थ्यांना उत्तेजित करण्यासाठी योग्य कृती सूचवा.

29. क्रीडा पद्धतीचा जनक कोण ?

30. प्राथमिक शाळेतील गणिताच्या भूमितीमध्ये वापरलेली कोणतीही दोन सूत्रे लिहा.

31. गणितामध्ये लघु टिप्पणी पुस्तिकाचे उपयोग कोणते ?

32. गणिताच्या अध्ययनातील दूरदर्शनाचे कोणतेही दोन तोटे ( बाधक ) लिहा.

33. नैदानिक परीक्षा म्हणजे काय ?

34. प्राथमिक शाळेच्या गणितातील तुमच्या निवडीच्या कोणत्याही पाठावर 'संबंध प्रस्थापित करणे' प्रकारावर कोणतेही दोन प्रश्न रचा.